महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २ रा | दिनांक : २१/१२/२०२५ | वार : रविवार

## राष्ट्रवादीचे आमदार संजय खोडके यांचा अपघात



राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विधान परिषदेचे आमदार संजय खोडके यांचा अमरावती शहरात भीषण अपघात झाला आहे. कार्यकर्त्यांच्या बैठकीसाठी दुचाकीवरून जात असताना एका चारचाकी वाहनाने त्यांना धडक दिली. या अपघातात आमदार खोडके यांच्या पायाला आणि मणक्याला गंभीर मार लागला असून, त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. याच अनुषंगाने कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी आणि बैठकांचे सत्र सुरू आहे. आज आमदार संजय खोडके हेदेखील अशाच एका कार्यकर्त्यांच्या बैठकीसाठी स्वतः दुचाकी चालवत जात होते. शहरातील एका चौकातून जात असताना वेगात आलेल्या एका चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, आमदार खोडके दुचाकीवरून उडून थेट रस्त्यावर पडले.

अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी तातडीने आमदार खोडके यांना उपचारासाठी अमरावती येथील रिम्स हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत त्यांच्या पायाला आणि मणक्याला गंभीर मार लागल्याचे निष्पन्न झाले आहे. सध्या त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

रस्त्याच्या कडेला असलेल्या एका दुकानाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हा संपूर्ण अपघात टिपला गेला आहे. या व्हिडिओमध्ये कारची धडक आणि त्यानंतर आमदार खोडके दूरवर फेकले गेल्याचे दृश्य स्पष्टपणे दिसत आहे. सध्या हा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, तो पाहून अपघाताच्या भीषणतेचा अंदाज येतो.

दरम्यान, या अपघातानंतर आपण सुरक्षित असल्याची प्रतिक्रिया खोडके यांनी दिली आहे. आज मी दुपारी ३ वाजता माझ्या दुचाकीने जात असतांना अपघात झाला. सध्या माझ्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. डॉक्टरांनी सर्व तपासण्या केल्या असून, रिपोर्ट सुद्धा नॉर्मल आहेत. मी सुखरूप आहे. काळजी करण्याचे कारण नाही. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार एक दिवस निगरानीमध्ये रुग्णालयात राहावे लागणार आहे. या काळात माझ्या सोबत असलेल्या माझ्या सर्व स्नेहीजणांचे मनापासून आभार, असे खोडके म्हणालेत.

संजय खोडके हे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र विधान परिषदेचे विद्यमान सदस्य आहेत. मार्च २०२५ मध्ये त्यांची विधान परिषदेवर वर्णी लागली होती. अजित पवार यांचे विश्वासू, निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख आहे. अमरावती महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि जिल्हा बँकेच्या राजकारणात त्यांची भूमिका नेहमीच निर्णायक राहिली आहे. संजय खोडके हे त्यांच्या दांडग्या जनसंपर्कासाठी आणि संघटन कौशल्यासाठी ओळखले जातात. मध्यंतरीच्या काळात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसपासून फारकत घेऊन स्वतंत्र गट स्थापन केला होता, मात्र पुन्हा स्वगृही परतल्यानंतर पक्षाने त्यांच्यावर विधान परिषदेची जबाबदारी सोपवली. सध्या ते पक्षाचे महत्त्वाचे पदाधिकारी म्हणून पश्चिम विदर्भात कार्यरत आहेत.

दरम्यान, संजय खोडके यांच्या पत्नी सुलभा खोडके या देखील अमरावती शहराच्या आमदार आहेत. एकाचवेळी पती व पत्नी आमदार असण्याची ही जिल्ह्याच्या राजकीय इतिहासातील पहिलीच वेळ आहे.

## थेट बोली लावून भाजप उमेदवारांना विजयी करा : रोहित पवार



**मुंबई** : राज्यातील 23 नगरपालिका आणि 76 नगरपंचायतींच्या १५४ जागांसाठी आज मतदानाची प्रक्रिया पार पडत असतानाच राजकीय वातावरण कमालीचे तापले होते. या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीकडून पैशांचा वापर आणि मतदारांची पळवापळवी होत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. "निवडणूक आयोगाने मतदानाचा फार्स करण्यापेक्षा थेट बोली लावून भाजपच्या उमेदवारांना विजयी घोषित करावे, जेणेकरून सरकारी तिजोरीतील पैसा तरी वाचेल," अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

आज पार पडलेल्या मतदार प्रक्रियेत राज्यात विविध ठिकाणी धक्कादायक प्रकार समोर आले आहेत. मराठवाड्यातील नांदेड (धर्माबाद) आणि ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथमध्ये मतदारांना पैशांचे आमिष दाखवून चक्क लग्नाच्या हॉलमध्ये कोंडून ठेवण्यात आल्याच्या तक्रारी आल्या आहेत. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली असून, रोहित पवार यांनी राज्य निवडणूक आयोगावर टीका केली आहे.

आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, भाजपवर शेकडो मतदारांना कोंडून लोकशाहीचा जाहीर लिलाव मांडल्याची टीका केली.

अंबरनाथ नगरपरिषदेत शिंदे सेनेने 200 बोगस मतदार आणल्याचा भाजपाचा आरोप आहे... इथंच भाजपाच्या उमेदवारांकडून मतदारांना पैसे वाटताना अजितदादांच्या राष्ट्रवादीने दोघांना पकडून भरारी पथकाच्या ताब्यात दिले आणि नांदेडच्या धर्माबादमध्ये पैशाचे अमिष दाखवून भाजपने शेकडो मतदारांना कोंडून ठेवत लोकशाहीचा जाहीर लिलाव मांडला, असा आरोप रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये केलाय.

लोकशाहीचे असे वस्त्रहरण होत असताना कोणत्याही परिस्थितीत भाजपला सत्ता मिळवून देण्याच्या मोहात अडकलेला निवडणूक आयोग मात्र धृतराष्ट्राप्रमाणे डोळ्याला पट्टी बांधून शांत बसलाय. हे असेच चालायचे असेल तर निवडणूक आयोगाने निवडणुका घेण्याचा फार्स न करता थेट बोली लावूनच भाजपच्या नगरसेवकांना विजयी घोषित करावे आणि त्यांच्या विजयाच्या जल्लोषात सहभागी होऊन गुलाल अंगावर घ्यायलाही हरकत नाही.! यामुळे किमान निवडणुकीसाठी खर्च होणारा सरकारी तिजोरीतील पैसा तरी वाचेल, असा खोचक टोला रोहित पवार यांनी राज्य निवडणूक आयोगाला लगावला.

## खुर्चीच हवी असती तर भाजपसोबत गेलो असतो! : आदित्य ठाकरे



**पुणे** : "आम्हाला जर फक्त खुर्चीची आणि सत्तेची चिंता असती, तर आम्ही केव्हाच भाजपसोबत गेलो असतो. पण आमचे राजकारण मूल्यांवर आधारित आहे, सत्ताकेंद्रित नाही. भाजपसोबत तडजोड करून सत्तेत बसण्यापेक्षा, लोकांसाठी आणि शहरांच्या हितासाठी भूमिका घेणं आम्हाला अधिक महत्त्वाचं वाटतं," अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून हल्ला चढवला.

आदित्य ठाकरे आज पुणे दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना शहरातील वाहतूक कोंडी, पर्यावरणाचा ऱ्हास आणि बिघडलेल्या कायदा-सुव्यवस्थेचा पाढाच वाचला. शिवाय एकनाथ शिंदे आणि भाजप नेते आशिष शेलार यांच्यावरही निशाणा साधला.

आदित्य ठाकरे यांनी भाजपच्या कार्यपद्धतीवर टीका करताना म्हटले की, "देशातील एक तरी असे शहर दाखवा जे भाजपशासित आहे आणि जिथे खरोखर सुधारणा झाली आहे. ज्या शहरांत किंवा राज्यांत भाजप सत्तेत आली, तिथे प्रगतीऐवजी उलट दिशेने प्रवास सुरू झाला आहे. प्रत्यक्ष जमिनीवर काम करण्याऐवजी दुसऱ्यांनी केलेल्या कामांची नावे बदलणे किंवा समाजात फूट पाडणे, हीच यांची राजकीय पॉलिसी आहे."

पुण्यातील नागरी प्रश्नांवर भाष्य करताना आदित्य ठाकरेंनी थेट अनुभवाचे दाखले दिले. "मुंबई-पुणे हे अंतर आज मला कधीच नव्हते इतके मोठे वाटले. हिंजवडीसारख्या भागात 25 मिनिटांच्या अंतरासाठी आज 2 तास लागतात. याचा थेट परिणाम गुंतवणूक आणि रोजगारावर होत आहे. पुणे शहर पूर्वी इतक्या सहज पाण्यात बुडायचं नाही, पण आता परिस्थिती गंभीर झाली आहे. ही केवळ लोकसंख्येमुळे झालेली कोंडी नसून प्रशासकीय अपयश आहे," असे आदित्य ठाकरे म्हणालेत.

रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंटच्या नावाखाली नदीचे पात्र अरुंद केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. "नदी पात्र खोल करण्याऐवजी ते अरुंद करणे हे जगातले एकमेव उदाहरण पुण्यात पाहायला मिळतेय. यामुळे 11 मंदिरे आणि 4 रस्ते पाण्याखाली जातील,"असा इशारा त्यांनी दिला. वेताळ टेकडीवरील प्रस्तावित रस्ता आणि बोगदा हा 'विकास' नसून 'विनाश' असल्याचे सांगत, आपण मंत्री असताना याला स्थगिती दिल्याची आठवण आदित्य ठाकरे यांनी करून दिली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ डिसेंबर २०२५


## अब्दुल मजीद सालार इक़रा उर्दू हायस्कूल, बोरनार येथे 'आनंदाई शनिवार'चे आयोजन



**बोरनार (प्रतिनिधी) :** इक़रा एज्युकेशन सोसायटी संचलित अब्दुल मजीद सालार इक़रा उर्दू हायस्कूल, बोरनार येथे प्रभारी मुख्याध्यापक आरिफ़ मोहम्मद ख़ान सर यांच्या नेतृत्वाखाली आनंदाई शनिवार या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता सातवीतील विद्यार्थी जजलान फारूक याच्या पवित्र कुरआन पठणाने झाली.

यावेळी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी नात, गजल, इंग्रजी कविता, हजल (विनोदी कविता), तसेच मनोरंजक लतीफे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांनी उत्साहाने आणि आनंदात कार्यक्रमात सहभाग घेतला.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मजहर सर, फिरोज सर, जव्वाद सर, सादिक सर, आबिद सर, अमीर सर तसेच शिक्षकेतर कर्मचारी आकिब सर, मुश्ताक भाई, युसूफ भाई आणि शब्बीर भाई यांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशन सर यांनी अत्यंत प्रभावी व रोचक पद्धतीने केले.प्रभारी मुख्याध्यापक आरिफ़ मोहम्मद ख़ान सर यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. या उपक्रमामुळे शाळेतील वातावरण आनंदमय झाले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली.

## गौताळा

वन सुंदर गौताळा,भटकंती होई पायी
शीळ घालती पाखरं, अलगद रे हृदयी

उंच शिखरे पर्वत, साद मनाला घालती
इंद्रधनु सप्तरंगी,त्यात वनराई भिजती

येता चाहूल वाघोबा,पळे हरीण माकडे
वाघ वनात फिरतो, दिमाखात चोहीकडे

वारा गुंजूनी कानात,सांगे महती वृक्षांची
गर्द अशी वनराई,खाण जशी सौंदर्याची

वाहे पावसात पाणी,झुळझुळ रे डोंगरी
धार जशी अमृताची,उतरली धरेवरी




ज्ञानेश्वर गायके..कन्नड

मो..९४०३३८४८८९


## बंदुकीचे ब्रास कॅप चोराच्या मुसक्या आवळन्यात पोलिसांना यश



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** समृद्धी महामार्गावर दौलताबाद पोलीस स्टेशन हद्दीतील टाकळी शिवारात चॅनेल क्र ४५१ वर दि रोजी विश्रांती साठी थांबलेल्या ट्रकच्या पाठीमागील दोरी कापून बंदुकीचे ब्रास कॅप जवळपास७१हजार रुपयांचे चोरून नेले असल्याची दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये मनीष नेवंदराम लोहानी, वय ३८ वर्ष, धंदा नोकरी (sk pa no- ४८७६ सेक्शन NCC), राहणार अंबरनाथ वेस्ट, जि. ठाणे यांनी दाखल केली होती .

फिर्यादीवरुन आयुध निर्माणी अंबरनाथ येथुन आयुध निर्माणी खंमरिया जबलपुर मध्यप्रदेश येथे २८० बॅग ब्रास कप असलेल्या प्रत्येक गोणीत २५ नग घेवुन आयशर क्र. MP ०४ GB ४४६४ ने समृद्धी महामार्गाने जात असतांना टाकळीवाडी शिवार चॅनेल क्र. ४५१ जवळ थोडावेळ विश्रांती साठी थांबले असता कोणीतरी अज्ञात इसमांनी त्यांचे वाहनाचे पाठीमागील ताडपत्रीला बांधलेली दोरी कापुन वाहनातुन ७१,५६८/- रु किंमतीचे बंदुकिच्या गोळ्या बनवण्यासाठी तयार करण्यात आलेला कच्चा माल (ब्रास कप) एकुण ४२ नग चोरी करुन नेले होते.

सदर चोरीच्या प्रकरणात कुठलेही धागे दोरे नसतांना दौलताबाद पोलीस स्टेशनचे तपास पथकाने गोपनिय माहिती काढुन सदरची चोरी आरोपी करण चरणसिंग घुनावत वय- १९ वर्ष, रा. टाकळीवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यानेच केली असल्याची खात्री झाल्याने त्यास दि. १७ रोजी ताब्यात घेवुन त्याचेकडुन ३५ नग ब्रास कप जप्त करून चरणसिंग याच्या कडुन उर्वरित मालापैकी ०४ नग ब्रास कप जप्त केले. एकुण ६६,४५६/- रुपये किंमतीचे एकुण ३९ नग ब्रास कप जप्त करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वसंत शेळके, आयुब पठाण, पोलीस अंमलदार खुशाल पाटील, महेश घुगे, ज्ञानेश्वर कोळी, सुनिल घुसिंगे, सुनिल पठारे यांनी पार पाडली.पुढील तपास उपनिरीक्षक आयुब पठाण हे करत आहे


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ डिसेंबर २०२५

# शिकत शिकत पुढे जाताना

विद्यार्थी जीवन हा माणसाच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा आणि सुंदर काळ असतो. या काळात मुलं शाळेत जातात, नवे ज्ञान मिळवतात, मित्र बनवतात, चांगल्या सवयी आत्मसात करतात आणि आयुष्यात पुढे जाण्यासाठी तयारी करतात. शिकत शिकत पुढे जाणे म्हणजे रोज काहीतरी नवीन शिकणे, स्वतःला सुधारत जाणे आणि आयुष्यात यशस्वी होण्यासाठी तयारी करणे होय. या प्रवासात यश आणि अपयश ही दोन्ही गोष्ट अनुभवायला मिळतात. दोन्ही अनुभव महत्त्वाचे आहेत कारण त्यातून आपल्याला खूप काही शिकायला मिळते. विद्यार्थी जीवनात यश म्हणजे केवळ परीक्षेत जास्त गुण मिळवणे नसते. यशाचे खरे स्वरूप म्हणजे प्रयत्न करणे, मेहनत करणे, शिस्त पाळणे आणि प्रत्येक गोष्ट लक्ष देऊन शिकणे. एखाद्या विद्यार्थ्याला आधी काही गोष्टी समजत नव्हत्या, पण प्रयत्नाने ते समजायला लागल्यास, हे खरे यश आहे. एखाद्या प्रश्नाचे उत्तर नीट सांगणे, एखादी गोष्ट लक्षात ठेवणे किंवा शिक्षकांची शाबासकी मिळणे ही सुद्धा यशाची उदाहरणे आहेत. यश मिळवण्यासाठी मेहनत फार महत्त्वाची आहे. नियमित अभ्यास, गृहपाठ पूर्ण करणे, नवीन गोष्टी शिकणे आणि शिक्षकांचे मार्गदर्शन ऐकणे यामुळेच विद्यार्थी यश मिळवतो. अभ्यास करताना लक्ष देणे, मन लावणे आणि वेळेचे नियोजन करणे खूप गरजेचे आहे. जो विद्यार्थी मेहनत करतो, तो हळूहळू प्रगती करतो. पण जो आळशी राहतो, त्याला अपयश येते. यश हे एक दिवसात मिळत नाही, त्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे असते. विद्यार्थी जीवनात खेळालाही महत्त्व आहे. खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहते आणि मन आनंदी राहते. मैदानी खेळ, योग किंवा इतर व्यायाम यामुळे शरीर मजबूत होते. खेळताना नियम पाळणे, संयम ठेवणे, सहकार्य करणे आणि जिंकणे-हरणे यातून शिकायला मिळते. ही सवय पुढे आयुष्यात खूप उपयोगी ठरते. खेळामुळे विद्यार्थ्याला मनःशांती मिळते आणि तो शिकण्यासाठी तयार राहतो. शिकत शिकत पुढे जाताना अपयश येणेही सामान्य आहे. एखाद्या परीक्षेत कमी गुण मिळणे, काही प्रश्न सुटणे किंवा स्पर्धेत हरणे म्हणजे अपयश. अपयश आल्यावर विद्यार्थ्याला दुःख वाटते, राग येतो किंवा काही वेळा तो निराश होतो. पण अपयश म्हणजे संपले आहे असे नाही. अपयश आपल्याला शिकवते की आपण कुठे चुकलो, काय सुधारायला हवं आणि पुढे कसे करावे. अपयशातून आपण धैर्य, संयम आणि मेहनत करण्याची सवय शिकतो. अपयश आल्यावर हार मानू नये. पुन्हा प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे. ज्या विद्यार्थ्याने अपयशातून शिकून प्रयत्न सुरू ठेवले, तो नक्कीच यशस्वी होतो. एखादा विद्यार्थी सुरुवातीला कमी गुण मिळवतो, पण पुढे प्रयत्न करून चांगले गुण मिळवतो, तर तो खऱ्या अर्थाने शिकत शिकत पुढे जातो. म्हणून अपयशाची भीती नको वाटावी ते फक्त आपल्याला सुधारण्याची संधी देते. विद्यार्थी जीवनात वेळेचे महत्त्व फार आहे. वेळेचा योग्य उपयोग केला तर अभ्यास, खेळ आणि इतर उपक्रम नीट करता येतात. वेळ वाया घालवला तर अभ्यास मागे पडतो आणि यश मिळणे कठीण होते. वेळेवर उठणे, वेळेवर अभ्यास करणे, वेळेवर खेळ करणे आणि वेळेवर झोपणे ही चांगली सवय लावल्यास विद्यार्थी नेहमी पुढे जातो. वेळेचे नियोजन करणारा विद्यार्थी यश मिळवतो. मित्रांचाही विद्यार्थ्यांच्या शिकण्यावर मोठा परिणाम होतो. चांगले मित्र आपल्याला अभ्यासात मदत करतात, योग्य सवयी शिकवतात आणि अडचणीच्या वेळी सोबत राहतात. वाईट सवयी असलेल्या मित्रांपासून दूर राहणे फार गरजेचे आहे. चांगली संगत असेल तर विद्यार्थी शिकायला आणि प्रगती करायला प्रेरित होतो. आई-वडील आणि शिक्षक हे विद्यार्थ्यांचे खरे मार्गदर्शक असतात. ते आपल्याला योग्य दिशा दाखवतात, चुका सुधारायला सांगतात आणि प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करतात. त्यांच्या सल्ल्याचे पालन केल्यास विद्यार्थी योग्य मार्गाने चालतो. त्यामुळे शिक्षकांचे आणि आई-वडीलांचे मार्गदर्शन ऐकणे आवश्यक आहे. शिकत शिकत पुढे जाताना विद्यार्थी केवळ अभ्यास शिकत नाही, तर आयुष्यातील चांगल्या सवयी, नियम पाळणे, संयम ठेवणे, वेळेचे महत्त्व समजून घेणे आणि चांगल्या मित्रांची निवड करणे हे सुद्धा शिकतो. या सवयी आयुष्यभर उपयोगी पडतात. सकारात्मक विचार ठेवणे, “मी करू शकतो” असा आत्मविश्वास ठेवणे, हा गुण यश मिळवण्यासाठी खूप महत्वाचा आहे. विद्यार्थी जीवनात मिळणारे अनुभव, शिकवण आणि प्रयत्न हे सर्व जीवनभर आपल्याला साथ देतात. मेहनत, शिस्त, धैर्य, मित्रत्व, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि योग्य सवयी या सर्वांमुळे विद्यार्थी चांगला माणूस आणि यशस्वी नागरिक बनतो. शिकत शिकत पुढे जाण्याचा प्रवास म्हणजे रोज काहीतरी नवीन शिकणे, प्रयत्न करणे, अपयशातून शिकणे आणि हळूहळू प्रगती करणे. हा प्रवास कधीच थांबत नाही. यश मिळवण्यासाठी सतत प्रयत्न करणे, मेहनत करणे आणि चांगल्या सवयी लावणे खूप महत्त्वाचे आहे. जो विद्यार्थी शिकत शिकत पुढे जातो, तो नक्कीच आयुष्यात यशस्वी होतो.



**विठ्ठल जयवंतराव**
अनमुलवाड परभणी
९०९६०७५६३०

# उपवास

आई आज मला
आहे बरं उपवास
माझ्यासाठी काय केले
फराळासाठी खास

खूप भूक लागली
कसा ठेवू धीर
लवकर दे मला
साबुदाण्याची खीर

शाळेत जाण्यापूर्वी चालेल
भगरीचा भात
सोबतीला असू दे
दही आमटीची साथ

मधल्या सुट्टीत खाईन
गूळ शेंगदाण्याचे लाडू
तयारीला लाग आता
घरात नको दडू

सायंकाळी ताव मारणार
रताळ्याच्या शिऱ्यावर
झोपण्यापूर्वी साबुदाण्याची
खिचडी खाईन भराभर

आजच्या दिवशी मुळीच
करणार नाही काम
रिकाम्या वेळात
मस्त करीन आराम



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता. महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

**ADMISSION OPEN**
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ डिसेंबर २०२५

# शेतीमाती अंतर्मनाचा ठाव घेणारा कवितासंग्रह 'घामाने भिजलेली माती'




कवी संदिप वाकडे यांचा 'घामाने भिजलेली माती' हा पहिला कविता संग्रह प्रकाशित होतोय. सुरुवातीच्या काळात मी त्यांच्या कविता सोशल मिडीयात वाचत, सुरुवाती पासूनच त्यांच्या कवितांत रानमाती चा गंध भरत गेलाय, माती बरोबरच माणुसकीचा जिव्हाळ्याने त्यांच्या कविता सिंचीत झाल्याय.. खाजगी इंग्रजी माध्यम शाळेत ज्ञानदानाचे काम करीत असतांनाच त्यांनी घाम आणि मातीशी नाते घट्ट पकडून ठेवलय, स्वत: शेतात राबतांना शेतीची होणारी वाताहत, शासन दरबारी होणारी परवड, सरकारी घोषणांचा कोरडा पाऊस, दुष्काळी झळा, बाजारात लुटला जाणारा कष्टकरी, समाजातील व्यसनाधीनता हे सर्व त्यांनी अनुभवलय... टेबलावर बसून शेती, निसर्ग सौंदर्याची खरडपट्टी ओढून कवित्वाचा टेंभा मिरवीणारे अनेक साहित्यिक उदयाला आलेय. परंतू स्वता घाम गाळून रानवाटा फिरुन शब्दबद्ध करण्याचा आनंद काही वेगळाच असतो. कवी संदिप वाकडे यांनी स्वताचे अनुभव कवितांत पेरल्याने, स्वानुभव व आत्मियतेचा ओलावा त्यांच्या प्रत्येक शब्दांत जाणवतो. त्यामुळे आत्मकथनाचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत उमटलेले दिसते. बऱ्याच काळा नंतर त्यांनी कविता संग्रह प्रकाशित करण्याचा निर्णय घेतलाय.या कविता संग्रहास प्रस्तावना साहित्यिका माधूरी चौथरी यांची लाभलीय, त्यात त्यांनी कवी मनाची उगल अतिशय समर्पक शब्दांत व्यक्त केलीय. सबंध संग्रहाचे सार प्रस्तावनेत प्रतिबिंबित झालेय. त्यामुळे संग्रहातील त्यांची प्रत्येक कविता बावन्नकशी सोनं आहे. याचा आम्हा सर्व साहित्य स्नेहींना अभिमान वाटतोय.कविता संग्रहातील पहिल्या कवितेत कवीने आईला स्थान दिले आहे. आई ची महती विशद करतांना कवी म्हणतो."जीवनाच्या या देव्हाऱ्यातमाय वसे रुदयातकार्य तिचे महानराहू तिच्या काळजात"... (०१)मातीशी ईमान राखत कवी आपल्या 'ओल्या मातीचा सुगंध' या कवितेत म्हणतो....."कणसांचे नाजूक मनोरेसाक्ष घामाची ते दाखवितीजाळून उन्हात स्वतहासशेतकरी सोन रे पिकविती"...(३३)कणसाला मनोर्याची 'उपमा' देण यातच कविचा शब्द भंडार किती मोठा आहे. ते दिसून येते. कवी केवळ शेतीमातीतच रमत नाही. तर तो समाजाची होणारी वाताहत पाहून ही व्यथित होतो. समाजातील व्यसनाधीनता त्याचे काळीज पिळून टाकते....व्यसनांमुळे तरणीबांड पोरं जेंव्हा चुकीचा निर्णय घेऊण हे जग सोडतात. तेंव्हा त्यांच्या पाठीमागे कुटूंबाची होणारी परवड कवीला व्यथित करते. मग कवी म्हणतो..."माय-बापा आधी तिरडी उठते लेकराचीदु:खाचा डोंगर कोसळतो तया डोईवरीमोडून पडते काठी म्हातारपणाचीव्यसनाने माती होते रे तुझ्या जीवनाची".... कुटूंबवत्सल स्वभावाचा कवी, आधूनिक समाजातील जेष्ठ नागरिकांची होणारी परवड पाहून व्यथित होतो. ज्यांनी आयुष्यभर काबाडकष्ट करुण मुलांना मोठे केले... म्हातारपणाची काठी होण्या ऐवजी ही स्वार्थी पोर स्वताच्या संसारात रममाण होईन आई बापाला विसरली. तेंव्हा कवी म्हणतो..."झोप कशी येते तुला सिमेंटच्या घरातमाय थंडीने मरतेय झोपडीच्या दारातत् बघतोस पाऊस बसून खिडकीतमायबाप ओलेचिंब गळक्या झोपडीत".....(३८) व्यसनाधिनतेने तरुणाई जितकी पोखरलेलीय तितकीच ती 'राजकीय' व्यसनापायी, आईबापा देव मानण्या ऐवजी ती नेते पक्षांना देव मानू लागलीय... या राजकीय व्यसनापायी ती आपल्या कुटूंब जबाबदारी ला विसरलीय... अशा रिकामटेक्या कार्यकर्त्यांना आपुलकीचा सल्ला देत कवी म्हणतो..."आई बापाला नाही झालेहे तुला काय होणारनको झेंडा कुणाचा वाहूतुझ्या खांद्यावर कुटूंबाचा भार"...(२८) शेतीमाती च्या वेदने बरोबरच कवी निसर्गाशी नाते जोडत शेताच्या बांधावर उभे राहून रणरणत्या उन्हात पावसाची चातका परी वाट पाहतो. मनोमनी त्या सावळ्या विठोबाला साकडे घालत म्हणतो..."विठूराया विनवितोहाक देना तू मेघांनाओसांडूनी वाहू द्यावेआटलेल्या धरणांना"...(१७) जणू काही कवीच्या आर्त विनवणीला तो मेघसावळा ही प्रतिसाद देतो. आणि धो धो कोसळते. सारे रान हिरवेगार करतो.मग कृतघ्नपणे कवी म्हणतो."काळ्या मायेच्या कुशीतरान भरल हिरवपिक वाढलं जोमातशेती बोलती कुशीत"... (२३) 'घामाने भिजलेली माती' हा केवळ एक कविता संग्रहच नाही. तर प्रत्येक कष्ठकर्यांच्या वेदना, संवेदनेचे प्रतिबिंब आहे. कवितांनी प्रत्येक ओळ वाचतांना डोळ्या समोर अवघे शेतमाळ ऊभे राहते. काळीज मातीच्या वेदनेने विव्हळते. समाजातील इष्ट अननिष्टतेची जाणिव होते. जबाबदारी चे भान येते. स्री जिवनाची व्यथा काळीज चिरते. आई वडीलां विषयी जाणिवेला पाझर फोडते. व्यवस्थेला धक्के देत. आक्रोशाची थिनगी पेटविते.... खरोखर कवी संदिप वाकडे यांचा हा पहिलाच कविता संग्रह काळजात काहून पेटवून जातोय. संग्रहातील सर्व ६१ कविता, वाचक, रसिकांच्या मनात घर करून जातोय. सर्व लहान थोरांनी आत्मसात करावी अशी ही 'काव्यधारा' अशीच चिरंतन वाहत राहो. ही सदिच्छा.....

**कविता संग्रह: घामाने भिजलेली माती**
कवी: संदिप वाकडे,
खेडा ता.कन्नड
प्रकाशन: लीला साहित्य पब्लिकेशन पुणे,
पृष्ठे: ९२
किंमत: १५० रुपये



**समीक्षक: अरुण थोरात, कळंकी**

# जागतिक ध्यान दिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व

२१ डिसेंबर हा दिवस जगभर जागतिक ध्यान दिन (World Meditation Day) म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ योग, ध्यान, विपश्यना किंवा अध्यात्माशी निगडित व्यक्तींसाठी मर्यादित नसून, आजच्या तणावपूर्ण, धावपळीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात प्रत्येक व्यक्तीसाठी आत्मपरीक्षण, मानसिक शांतता आणि जीवनातील समतोल साधण्याचा संदेश देणारा आहे. आधुनिक मानवाने विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, माहिती आणि दळणवळणाच्या साधनांमध्ये अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु याच वेळी मानसिक तणाव, अस्वस्थता, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि असमाधान हे जीवनाचे अविभाज्य भाग बनले आहेत. बाह्य प्रगतीच्या वेगात अंतर्मनाची गरज दुर्लक्षित होत चालली आहे. अशा पार्श्वभूमीवर ध्यान ही केवळ आध्यात्मिक साधना न राहता, मानसिक आरोग्य, सामाजिक सलोखा आणि मानवता जपण्यासाठी अत्यावश्यक साधन ठरत आहे. जागतिक ध्यान दिन हे या व्यापक समाजशास्त्रीय संदर्भाचे प्रतीक आहे आणि प्रत्येक व्यक्तीस स्वतःच्या अंतर्मनाशी संवाद साधण्याची संधी देते.मानव जीवनातील मानसिक अस्वस्थतेचे थेट प्रतिबिंब समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता अत्यंत गंभीर आहे. आजच्या समाजात सततची स्पर्धा, अपयशाची भीती, आर्थिक अस्थैर्य, सामाजिक अपेक्षांचा ओझा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या थकलेली आहे. कौटुंबिक कलह, घटस्फोट, व्यसनाधीनता, आत्महत्यांचे वाढते प्रमाण आणि सामाजिक हिंसा या सर्व समस्या या मानसिक असंतुलनाचे परिणाम आहेत. समाजशास्त्र सांगते की, व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य हे वैयक्तिक मर्यादेत न राहता समाजाच्या आरोग्याशी थेट संबंधित आहे. त्यामुळे मानसिकदृष्ट्या अस्थिर व्यक्तीचा परिणाम केवळ त्याच्या वैयक्तिक जीवनावर नाही, तर कुटुंब, शाळा, कामाचे ठिकाण आणि समाजावरही होतो. ध्यान ही प्रक्रिया व्यक्तीला या बाह्य तणावापासून दूर नेऊन स्वतःच्या अंतर्मनाशी जोडते, त्यामुळे मानसिक संतुलन निर्माण होते आणि व्यक्तीचे सामाजिक वर्तन अधिक सकारात्मक बनते.ध्यानाची परंपरा प्राचीन मानवतेइतकीच जुनी आहे. भारतीय तत्त्वज्ञान, उपनिषद, योग, बौद्ध तत्त्वज्ञानातील मध्यम मार्ग, जैन धर्मातील आत्मशुद्धीचा विचार, सूफी संतांचे मौन व अंतर्मुखतेचे साधन, ख्रिस्ती मिस्टिसिझम (Mysticism) किंवा चिनी ताओ तत्त्वज्ञान या सर्वच परंपरांमध्ये अंतर्मुखता, मौन आणि आत्मचिंतन यांना महत्त्व दिले गेले आहे. या परंपरांचा उद्देश केवळ वैयक्तिक मोक्ष किंवा अध्यात्मिक उन्नती नव्हता, तर समाजात करुणा, संयम, सहिष्णुता, नैतिकता आणि सामंजस्य निर्माण करणे हाच होता. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, ध्यान व्यक्तीच्या अहंकाराला मवाळते आणि तिला समाजाशी अधिक सुसंवादी बनवते. जेव्हा व्यक्ती स्वतःच्या विचार-भावनांचे निरीक्षण करू लागते, तेव्हा ती इतरांच्या भावना समजून घेण्यास अधिक सक्षम होते. परिणामी, सामाजिक नातेसंबंध अधिक दृढ होतात, संवाद सुधारतो आणि सामूहिक सहकार्य वाढते.आधुनिक समाजात तणाव हा जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. भांडवलशाही, उपभोगवाद, सततची स्पर्धा, सामाजिक तुलना, आर्थिक अस्थैर्य, भविष्यातील असुरक्षितता आणि यशाची व्याख्या केवळ पद, पैसा आणि प्रतिष्ठेपुरती मर्यादित झाल्यामुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या तणावाखाली राहत आहे. सतत इतरांशी तुलना करणे, अपयशाची भीती, अपेक्षांचा भार आणि वैयक्तिक ओळखीचा संघर्ष हे मानसिक असंतुलन वाढवतात. ध्यानामुळे व्यक्ती या सततच्या तुलनांपासून व अपेक्षांपासून काही वेळ दूर राहू शकते, वर्तमान क्षणात जगण्याची सवय लागते आणि जीवनातील छोटे, साधे आनंद अनुभवता येतात. परिणामस्वरूप, व्यक्ती स्वतःच्या जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहू लागते, मानसिक ताण कमी होतो आणि भावनिक स्थैर्य वाढते.कौटुंबिक जीवनावर ध्यानाचा परिणामही महत्त्वाचा आहे. आज अनेक कुटुंबांमध्ये संवादाचा अभाव, गैरसमज, वेळेची कमतरता आणि सततचा तणाव यामुळे नातेसंबंध ताणलेले आहेत. घरगुती वाद, संयमाचा अभाव, चिडचिड यामुळे कुटुंबात अस्थिरता निर्माण होते. ध्यानामुळे मन शांत झाल्यावर व्यक्ती संयमी, समजूतदार आणि संवेदनशील बनते. त्यामुळे संवाद सुधारतो, सहनशीलता वाढते, आणि कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ होतात. शांत मनातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा संपूर्ण घरच्या वातावरणावर परिणाम करते आणि सामाजिक सलोखा मजबूत होतो.शिक्षणक्षेत्रात ध्यानाचे महत्त्व आज विशेषत्वाने जाणवते. विद्यार्थ्यांचे जीवन आज प्रचंड स्पर्धेने भरलेले आहे. परीक्षा, गुण, करिअर, पालकांच्या अपेक्षा आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असतात. लहान वयातच तणाव, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव जाणवतो. ध्यानामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती सुधारते, भावनिक समतोल राखला जातो आणि शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी बनते. मानसिकदृष्ट्या संतुलित विद्यार्थी पुढे जाऊन समाजात अधिक जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनतात. म्हणूनच शिक्षणसंस्थांनी ध्यानाचा समावेश करणे काळाची गरज आहे.कामकाजाच्या ठिकाणीही ध्यानाचे महत्त्व मोठे आहे. दीर्घ कामाचे तास, कामाचा ताण, लक्ष्यपूर्तीची सततची धावपळ आणि नोकरीची असुरक्षितता यामुळे कर्मचारी मानसिकदृष्ट्या थकलेले असतात. याचा परिणाम कार्यक्षमतेवर, आरोग्यावर, वैयक्तिक जीवनावर आणि सामाजिक नात्यांवर होतो. ध्यानामुळे मन शांत राहते, निर्णयक्षमता सुधारते, तणाव कमी होतो आणि सहकाऱ्यांशी नातेसंबंध अधिक सौहार्दपूर्ण बनतात. त्यामुळे कार्यस्थळी सकारात्मक वातावरण निर्माण होते आणि उत्पादनक्षमता वाढते.स्त्रियांच्या जीवनात ध्यानाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवते. अनेक पातळ्यांवर जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा, कौटुंबिक भूमिका आणि स्वतःची ओळख जपण्याचा संघर्ष यामुळे स्त्रिया मानसिकदृष्ट्या थकतात. स्वतःसाठी वेळ काढणे अनेकदा त्यांना शक्य होत नाही. ध्यान स्त्रियांना स्वतःशी जोडते, अंतर्मनाचा आवाज ऐकायला शिकवते आणि भावनिक बळ देते. मानसिकदृष्ट्या सक्षम स्त्री ही कुटुंबात शांतता आणि समाजात सकारात्मकता पसरवू शकते. त्यामुळे ध्यान केवळ वैयक्तिक नाही तर सामाजिक आरोग्यासाठीही महत्त्वाचे ठरते.डिजिटल युगात ध्यानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि सतत उपलब्ध असलेली माहिती यामुळे मनाला विश्रांती मिळत नाही. सतत येणाऱ्या सूचना, संदेश आणि आभासी जगातील तुलना यामुळे असमाधान, एकाकीपणा आणि तणाव वाढतो. अनेकदा लोक आभासी जगात अधिक आणि वास्तवात कमी जगताना दिसतात. ध्यान ही प्रक्रिया माणसाला या डिजिटल गोंगाटातून बाहेर काढते, स्वतःच्या वास्तवाशी जोडते आणि मन शांत ठेवते. काही काळ श्वासावर लक्ष केंद्रित केल्यास मानसिक ताण कमी होतो, भावनिक स्थैर्य वाढते आणि सजगता, आत्मभान आणि संवेदनशीलता विकसित होते.पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही ध्यानाचे महत्त्व अधोरेखित होते. निसर्गापासून तुटलेले नाते, अतिरेकी उपभोग, लोभ व प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. शांत मनातून निसर्गाकडे पाहिल्याने त्याचे महत्त्व जाणवते, जपणुकीची भावना निर्माण होते आणि शाश्वत जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा मिळते. अंतर्मन शांत झाल्यावर बाह्य जगाशी असलेले नाते अधिक सुसंवादी, जबाबदार आणि समतोल बनते.जागतिक ध्यान दिन साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे जगभरातील लोकांनी काही क्षण स्वतःसाठी काढून अंतर्मनाशी संवाद साधावा, जीवनाच्या धावपळीला विराम द्यावा आणि जीवनातील खरी मूल्ये जाणीवपूर्वक अनुभवावी. ध्यान कोणत्याही एका धर्माशी, जातीशी किंवा पंथाशी मर्यादित नाही. ते सार्वत्रिक मानवी अनुभवाचे साधन आहे, जे प्रत्येक व्यक्तीस मानसिक स्थैर्य, सामाजिक संवेदनशीलता आणि जीवनाचा समतोल साधण्याची संधी देते.समारोप करताना असे म्हणता येईल की, जागतिक ध्यान दिन हा केवळ एका दिवसापुरता उत्सव नसून, तो मानसिक, भावनिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समतोल साधण्याचा संदेश देणारा दिवस आहे. बाह्य प्रगती जितकी महत्त्वाची आहे, तितकीच अंतर्मनाची शांतताही आवश्यक आहे. शांत, स्थिर, सजग आणि संवेदनशील मन हेच सुखी, समतोल आणि समाधानकारक जीवनाचे खरे अधिष्ठान आहे. २१ डिसेंबरचा जागतिक ध्यान दिन आपल्याला हेच शिकवतो की, धावत्या जगात काही क्षण थांबून स्वतःकडे पाहणे, अंतर्मनाशी संवाद साधणे, जीवनातील तणाव कमी करणे आणि समाजाशी सुसंवाद ठेवणे हेच खरे मानवतेचे आणि समृद्धतेचे मूळ आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com